Supl 2018


UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143


# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

# CURRENT GLOBAL REVIEWER

**Half Yearly** | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X VolIV, Sept. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**


| | | | |
|---|---|---|---|
| 17 | धार्मीक आतंकवाद और विश्व राजनीती | विश्वनाथ हणमंतराव पवार | 79 |
| 18 | अज्ञेय की कहानियों में व्यक्त देश-विभाजन की त्रासदी | प्रा.आर.एम.खराडे | 82 |
| 19 | आधुनिक नारी की सशक्त तस्वीर - दौड | प्रा.डॉ.राजश्री भामरे | 87 |
| 20 | फणीश्वरनाथरेणु की कहानियोंमेंआँचलिकताकाचित्रण | प्रा. सूर्यवंशी एस. एम. | 91 |
| 21 | "कबीरऔरउनकीसामाजिकचेतनावर्तमान के संदर्भमें" | डॉ. प्रदीप सूर्यवंशी | 96 |
| 22 | "भारतसरताज़ जम्मू–कश्मीर के पर्यटक–स्थलोंमेंपर्यटकऔरपर्यटन की संभावनाएं एवंचुनौतियां" | रविकुमार | 100 |
| 23 | आंबेडकरवाद : इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह | डॉ. आर. एस. पारवे | 112 |
| 24 | मीडियाकासामाजिकदायित्व | पूजा शर्मा | 115 |
| 25 | जीवन काचित्रण | स. प्रा. डॉ. राजेश प्रल्हादराव आरदवाड | 117 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol IV Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# आंबेडकरवाद : इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह

**डॉ. आर. एस. पारवे**
संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर

-------- (23) --------------------------------------------------------------------------

मानवाच्या जीवनामध्ये इतिहासाला महत्त्वाचे स्थान आहे. कारण इतिहासाशिवाय मनुष्य जीवन जगू शकत नाही, भूतकाळात जे जे घडले तो आज इतिहास होतो. भूतकाळात घडलेल्या घटनांचा व विचार स्त्रोतांचा अभ्यास, त्यांची चौकशी, विश्लेषण, अर्थ व अन्वयार्थांचा शोध म्हणजे इतिहास आणि हा शोध आपण वर्तमानाच्या संदर्भात घेत असतो. इतिहासाची जाण नसलेला समाज हा स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखा असतो.

जॉन सिली हा इतिहास शास्त्रज्ञ व विचारवंत गतकाळातील घटनांचा मागोवा घेताना असे म्हणतो की, "भूतकाळातील राजकारण म्हणजेच इतिहास होय." याच भूमिकेतून गतकाळातील राजघराणी, त्यांची साम्राज्य, त्यांनी केलेली संघर्ष, लढाया, सुधारणा, धर्मप्रसार हा इतिहास अभ्यासाचा प्रमुख गाभा ठरतो. त्यामुळे जगभराच्या देशातील इतिहास लेखनात राजकीय इतिहासाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले.[१] परंतु अलीकडील काळामध्ये इतिहास हा मर्यादित न राहता त्याला व्यापक असे स्वरूप प्राप्त झाले आहे, मानवी जीवनाच्या वाटचालीचा समग्र आलेख म्हणजे इतिहास होय. या संज्ञेला अलीकडे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण इतिहास हा नुसता राजे लोकांचा, त्यांच्या लढाया किंवा सुधारणा एवढेच नाही, तर इतिहासामध्ये समाजाच्या नैतिकतेच्या कल्पना, धार्मिक मूल्ये, राजकीय विचारप्रणाली, राजकीय परंपरा, साहित्य, कला, स्थापत्य याबरोबरच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, मानवी हक्क यासाठी झालेले लढे व त्यांचे विचार इत्यादीचा देखील इतिहास आहे. समाजातल्या सामान्य माणसाचा देखील इतिहास असतो. अनेक विचारातून इतिहास संशोधन आणि लेखन सातत्याने चालू राहणारी प्रक्रिया आहे.

**इतिहासाची पुनर्मांडणी :**

प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची परंपरा अखंडपणे चालू आहे. या लेखन परंपरेने मात्र अनेक वळण घेत नवनवीन विचार प्रवाह निर्माण केले. प्रस्थापित इतिहासातील काही विसंगती ध्यानात येतात म्हणून या तपासण्यासाठी पुन्हा शोध घ्यावा लागतो. त्यामुळे त्याची पुनर्मांडणी करावी लागते किंवा भूतकाळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो किंवा नव्याने काही पुरावे समोर येतात. वर्तमानाच्या अनुषंगाने गतकाळ शोधला जात असतो. वर्तमान बदलले की, गतकाळाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.[२] त्यामुळे इतिहासाची पुनर्मांडणी देखील अनिवार्य ठरते.

**भारतीय इतिहास लेखनातील प्रवाह :**

वर्तमान बदलला की इतिहास लेखनातील विचार प्रवाह बदलतात व नवीन विचार प्रवाह उदयास येतो. जगामध्ये अनेक दृष्टीकोनातून इतिहासाचे लेखन झाले आहे व होत आहे. काही वेळेस इतिहास लेखनावर धर्माचा प्रभाव राहिला तर काही वेळेस राजे लोकांचा प्रभाव राहिला. अशा प्रकारे भारतीय इतिहास लेखनामध्ये काही प्रवाह निर्माण झाली.[३] भारतात प्राचीन काळात धर्म आणि राजसत्ता हे समाजजीवनाचे प्रमुख घटक होते. त्यामुळे सहाजिकच जे काही लेखन झाले ते राजसत्ता, धर्म, यासंबंधी होते. इ.स. १४५३ मध्ये ऑटोमन रोमन साम्राज्य पडले आणि आधुनिक युगाची नांदी सुरू झ ााली. कर्तुत्वावरचा विश्वास वाढीस लागून माणसामाणसातील समतेचा विचार मांडला जाऊ लागला. व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार आला. यातून इतिहासात नवा विचार प्रवाह वाहू लागला. कार्ल मार्क्स या इतिहासकारांनी गतकाळातील वाटचालीचे आर्थिक पैलू व विचार मांडले, उत्पादनाची साधने असलेले माणूस व इतर सामान्य माणूस यांच्यातल्या संबंधाची चिकित्सा केली. समाजातला वर्ग कलह रेखाटला गेला. गतकाळातील सामान्य माणसाची पिळवणूक, दूरावस्था, त्यांच्यावर होणारा अन्याय हा इतिहासाचा अभ्यासाचा विषय झाला. यातूनच मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह उदयास आला.

ब्रिटिशांनी भारतामध्ये साम्राज्य प्रस्थापित केल्यानंतर काही ब्रिटिश पाश्चात्य विचारवंतांनी भारतीय धर्माचा, संस्कृतीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. कारण भारतावर जर जास्त दिवस राज्य करावयाचे असेल तर भारतीय लोकांच्या भाव-भावना समजून घेणे गरजेचे होते. त्यादृष्टीने काही लोकांनी भारताविषयी लिखान केले. पण ते लिखान

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol IV Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

यांच्या विचार व कार्याची म्हणजेच आंबेडकरवादी विचारांची माहिती मिळते. या आंबेडकर वादावर आधारित भारताच्या सबंध इतिहासाची नव्याने मांडणी करणे गरजेचे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इतिहास लेखन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विपुल प्रमाणात इतिहास लिखान केलेले आहे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, धर्म, कायदा, पत्रकारिता व इतिहास इत्यादी अनेक विषयांशी निगडित विविध ग्रंथ लिहिले आहे. यामध्ये डॉ. आंबेडकरांनी भारतीय इतिहासाचे केलेले लिखान महत्त्वपूर्ण आहे. डॉ. आंबेडकर यांनी इतिहास लेखनाच्या क्षेत्रामध्ये अनेक नवीन सिद्धांत मांडले आहे. 'अस्पृश्य पूर्वी कोण होते', भारतातील जातीव्यवस्थेचे निर्मूलन, रिडल्स इन हिंदुइझम इत्यादी अनेक ग्रंथांमधून डॉ. आंबेडकर हे भारतीय इतिहासाच्या कालखंडाची नव्याने मांडणी करतात. शुद्रांच्या मूळ अवस्थेचा शोध घेऊन त्यांना शुद्रत्व कसे प्राप्त झाले, अस्पृश्य मूळचे कोण होते, भारतीय समाजव्यवस्थेचा उगम कसा झाला या सर्व मुद्यांचे डॉ. आंबेडकरांनी तर्कशुद्ध पद्धतीने विवेचन केले आहे.

डॉ. आंबेडकरांनी प्राचीन भारताच्या इतिहासाबाबत आपले निष्कर्ष मांडताना तत्कालीन भारताच्या सामाजिक व आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनाचा अत्यंत बारकाईने अभ्यास केलेला आहे. त्यांनी मनुस्मृती, यज्ञवाकल्य स्मृती, विष्णुस्मृति, ब्राह्मण्ये, धर्मसूत्रे इत्यादीच्या आधारे प्राचीन भारताच्या इतिहासाची मिंमांसा केलेली आहे. आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वी येथे नाग लोकांची साम्राज्ये होती. ही साम्राज्य व नाग राज्य अत्यंत शक्तीशाली होती. आर्य व अनार्य असलेले नाग यांच्यातील युद्ध आर्यांनी अनार्यांना गुलाम कसे केले इत्यादीचा इतिहास डॉ. आंबेडकर यांनी आपल्या लिखानातून मांडला आहे. बौद्धकाळ, ब्राह्मणी कालखंडातील शुंग, कण्व, गुप्त इत्यादी राजवटीमध्ये बौद्धांवर व शुद्रांवर झालेले अन्याय इत्यादी संबंधी डॉ. आंबेडकरांनी लिखान केलेले आहे. याबरोबरच मुस्लिम आक्रमकांच्या आगमनाच्या काळासंबंधी त्यांनी लिखान केले आहे. सम्राट अशोकाचा वैभवसंपन्न कालखंड, शुंगांनी बौद्धांच्या केलेल्या कत्तली तसेच आर्यांनी भारत भूमीवर आक्रमण करुन येथील मूळ रहिवासी असलेल्या अनार्यांना गुलाम बनवले. तसचे अनार्यांवर आपली संस्कृती व धर्म इत्यादींचे विवेचन डॉ. आंबेडकर यांनी आपल्या लिखानातून केले आहे.[८] एकंदरीतच भारताच्या इतिहासाची ते नव्याने मांडणी करतात व अस्पृश्यांच्या अस्तित्वाचा शोध घेतात.

इतिहास लेखनाची दिशा स्वतः डॉ. आंबेडकर यांनी आपल्या इतिहास लिखानातून दाखवलेली आहे. डॉ. आंबेडकर यांनी आपले संपूर्ण जीवन अस्पृश्यांच्या उद्धारासाठी अर्पण केलेले आहे. मानवी मूल्य व अधिकार यासाठी सतत संघर्ष केला. अस्पृश्यांचे प्रश्न, समाजाच्या मागण्या, त्यांचे हक्क व संरक्षण इत्यादी बाबींमध्ये ते सतत लढा देत असतानाही भारतीय ऐक्याचे ध्येयदेखील आंबेडकरांनी शेवटपर्यंत सोडलेले नाही. आंबेडकरांनी केलेले हे कार्य व त्यांचे विचार म्हणजेच आंबेडकरवाद होय. या आंबेडकरवादी विचार प्रवाहातून ज्या ज्या इतिहासकारांनी इतिहास लेखन केले त्यामध्ये सर्वप्रथम डॉ. आंबेडकर हे स्वतः होते. त्यामुळे इतिहास लेखनातील आंबेडकरवादी विचार प्रवाहानुसार इतिहास लेखन करणाऱ्यांना निश्चित दिशा मिळते. या पद्धतीने आज भारताच्या सबंध इतिहासाची नव्याने मांडणी झाली पाहिजे, कारण आजही अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्याच्या कामामध्ये निश्चित योग्य अशी दिशा मिळविण्यासाठी आंबेडकरवादी विचारप्रवाह इतिहासाचे पुनर्लेखनामध्ये गतिमान होणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

०१. डॉ. प्रभाकर देव - इतिहास एक शास्त्र, पान क्र. १२, १३
०२. कित्ता - पान क्र. २८०
०३. डॉ. सुरेश चौथाईवाले - इतिहासाचे तत्वज्ञान, पान क्र. १९२
०४. कित्ता - पान क्र. २०५
०५. शरद पाटील - मार्क्सवाद : फुले-आंबेडकरवाद, पान क्र. १९
०६. केशव मेश्राम - डॉ. आंबेडकर चिंतन, पान क्र. ३५
०७. डॉ. योगेंद्र मेश्राम - आंबेडकरवादी वाङमयीन जाणिवांची अक्षर साक्ष, पान क्र. ४३

Current Global Reviewer

ISSN 2319-8648

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

UGC Approved Journal
Sr. No. 64310



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in